केसरी
पुणे, २३ मार्च २०२५/३

## विमानसेवा सुरू

येथील वीज उपकेंद्रातील आगीमुळे हिथ्रोसह
ला होता. त्यामुळे विमानसेवा बंद करण्यात
वत सुरू झाली आहे. त्यामुळे विमानतळावर
केचा निःश्वास सोडला. युरोपमधील सर्वांत
हिथ्रोचा वीजपुरवठा बंद पडल्याने शुक्रवारी
. एक हजारांवर विमानांची उड्डाणे रोखली होती.
ली होती. सुमारे दहा हजार विमानप्रवासी अडकले
े प्रकार घडला होता. सुमारे दीडशे घरांची वीज
जार ३०० विमानांची उड्डाणे रद्द झाली होती.

**नवी दिल्ली :** प
प्रयत्न करा, असे अ
पाणी दिवस काल स
जपून वापरण्याचे अ
कटिबद्ध आहे. तसेच
जीवन आहे. त्यामुळे
जबाबदारी आहे. पाण
ठरणार आहे, असे अ
वर्षी २२ मार्च हा दि

# टिळक विद्यापीठात नेत्र तपासणी शिबिर

**पुणे :** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे कर्मचारी कल्याण समिती आणि पुणे अंध जन मंडळ संचलित एच व्ही देसाई नेत्र रुग्णालयाच्या वतीने शनिवार दि. २२ रोजी विद्यापीठाच्या गुलटेकडी येथील आवारात मोफत नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले होते. टिमविचे कर्मचारी आणि परिसरातील नागरिक असे १५० पेक्षा अधिक पुरुष आणि महिलांनी या शिबिरात डोळे तपासणी केली.

या शिबिरात ज्यांच्या डोळ्यांमध्ये मोतीबिंदू आढळला त्यांच्यासाठी सोमवार दि. २४ रोजी एचव्ही देसाई रुग्णालयाच्या वतीने मोतीबिंदूची शस्त्रक्रिया मोफत केली जाणार आहे. या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. गीताली टिळक यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्या बोलत असताना प्रत्येकाने आपल्या डोळ्यांची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर्मचारी कल्याण समितीचे डॉ.प्रवीण जाधव, डॉ. कार्तिकी सुबकडे, सहाय्यक प्राध्यापिका रीना भाटी, पल्लवी जोशी आणि ऋषिकेश केळकर यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. या प्रसंगी विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. सुवर्णा साठे, सचिव अजित खाडीलकर, तसेच एचव्ही देसाई नेत्र रुग्णालय यांचे मंगेश कुलकर्णी आणि नेत्र रुग्णालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



टिळक महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित नेत्र तपासणी शिबिरावेळी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक यांच्यासह डॉक्टर्स व कर्मचारी उपस्थित होते.

## नामांकित कंपनीच्या नावाने बनावट ऑईलची विक्री

**पिंपरी :** कॅस्ट्रॉल कंपनीच्या डब्यामध्ये बनावट ऑईल विकल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. देहूगाव येथे शुक्रवारी ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी गौरव श्रीवास्तव यांनी देहूरोड पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार खुददोस शेख (वय ४२, रा. हडपसर, पुणे) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणताही परवाना नसताना आरोपीने फिर्यादी यांच्या कॅस्ट्रॉल कंपनीच्या डब्यामध्ये बॅरलमधून आणलेला १ लाख ५० हजार ८५० रुपयांचे ऑईल ओतले. त्यावर फिर्यादी यांच्या कंपनीच्या नावाचे स्टिकर्स लावून बेकायदेशीरपणे विकताना आरोपी आढळून आला.